विभागांतर्गत "स्वतंत्र जेष्ठ नागरीक कक्ष"निर्माण करणेबाबत.

" जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
१ ला मजला, विस्तार दालन क्र. १५६,हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

क्र.आस्थाप्र-२०२५/प्र.क्र.४६/आस्था-१ दि. २२ एप्रिल,२०२५

## कार्यालयीन आदेश

ज्येष्ठ नागरिकांना वृध्दापकाळामध्ये आर्थिक बाबतीत सक्षम करणे, वैद्यकीय मदत मिळवून देणे, छळ-पिळवणूक यापासून संरक्षण, सुरक्षितता, जिवित व मालमत्तेचे संरक्षणाबाबत मदत, निवारा, अपघात विमा संरक्षण इ. सोयोसुविधा पुरविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ स्थापन करण्यास दि.१२.९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सामासू कार्यासनाकडून ज्येष्ठ नागरीकासांठी राबविण्यात येणाऱ्या योजना एकाच छत्राखाली आणून त्या योजनांचा लाभ संबंधित जेष्ठ नागरिकांना देण्यासाठी तसेच राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ ची अंमलबजावणी करण्याबाबत दि.९.७.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही होणेकरीता **स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक कक्ष** निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. या कार्यालयीन आदेशान्वये ज्येष्ठ नागरीकासांठी राबविण्यात येणाऱ्या योजना राबविण्याकरीता **"स्वतंत्र जेष्ठ नागरीक कक्ष"** स्थापन करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

३. महामंडळे कार्यासनाकडील जेष्ठ नागरीक महामंडळ व संबंधित कामकाज तसेच जेष्ठ नागरीकांसाठी सामासू कार्यासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचे कामकाज जेष्ठ नागरीक कक्षाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहेत.

४. सदर विषयाच्या संबंधित कामकाजासाठी १ कक्ष अधिकारी, १ सहायक कक्ष अधिकारी व १ लिपिक-टंकलेखक संवर्गातील खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांकडे तात्पुरत्या स्वरुपात अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | कार्यरत असलेले कार्यासन |
|---|---|---|
| १. | श्री. राजेश मांजरेकर, कक्ष अधिकारी | सामासू |
| २. | श्री. राहुल मेहेत्रे, सहायक कक्ष अधिकारी | अजाक |
| ३. | श्री. जगदिश देवरे,लिपिक-टंकलेखक | महामंडळे |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( प्रशान्त वाघ )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत : १. मा. मंत्री, सा.न्या यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव, सा.न्या.व .वि. स .विभाग यांचे स्वीय सहायक,
४. सर्व सह / उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सा.न्या.व.वि.स.विभाग, मंत्रालय,
५ अवर सचिव, लेखाशाखा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,
६ निवड नस्ती.

C:\Users\vedika rathod\Desktop\ज्येष्ठ नागरीक कक्ष.docx